


Review Of Research

# मराठी कवितेतून व्यक्त झालेल्या प्रसन्न प्रेमानुभवाचा विचार

प्रा. डॉ. संजय लांडगे
मराठी विभाग प्रमुख , अे.आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.

## प्रस्तावना

आधुनिक मराठी कवितेत प्रथम व्यक्तिगत प्रेमानुभव केशवसुतानी व्यक्त केला नंतरच्या गोविंदाग्रज, तांबे, बोरकर, इंदिरासंत इत्यादी कवीप्रमाणें पाडगावकरांनीही मुक्त प्रेमानुभव व्यक्त केला आहे. त्यांच्या प्रेमकाव्यातून अनुभवाचे क्षण चितारले आहे. हे अनुभव काल्पनिक नसून प्रत्यक्ष उपभोगलेल्या



क्षणांचा हा आलेख आहे. ह्या प्रेमचित्रात त्यांचे भावरंग उठून दिसतात प्रेम आणि निसर्ग ही त्यांच्या काव्यातील जुळी भावंडे, ती इतकी एकजीव झालेली आहेत की ते वेगळे म्हणून दाखवता येणे अवघड आहे. म्हणूनच प्रेम हा त्यांच्या काव्याचा आत्मा आहे असे म्हणणे वावगे होणार नाही.

पाडगावकरांच्या प्रेमजीवनाबरोबर त्यांचे प्रेमकाव्य बहरले आहे. फुलले आहे. वैयक्तिक प्रेमाविष्कारामुळे संवेध झाले आहे. त्यामुळे त्यांचे प्रेम काव्य सजीव व रसरसीत असे अनुभूत होते.

प्रेमाच्या हळुवार पण मध्यमवर्गीय संवेदना त्यांच्या प्रेमकवितेतून प्रतिबिंबित होतात. प्रेम ही कल्पना आंतरिक ओढीची आहे. त्यामुळे

‘‘प्रीती मिळेल का हो बाजारी ! प्रीती मिळेल का हो शेजारी ।।’’

अशी याचना प्रेमनिष्ठेत नसते. स्त्रीचे प्रेम उत्कट असते आणि ते माणसाला जगवीत असते. जीवनाला आधार ठरते. पाडगावकर तर प्रेम हा जीवनांचा आधारच मानतात ते म्हणतात–

''तू प्रेम केलंस म्हणून
जगात या जगावंसं वाटतं मला
तू प्रेम केलंस म्हणून
माझं गाणं गावं असं वाटतं मला'' (मंगेश पाडगांवकर, बोलगाणी, पृ. क्र. ७)

आपल्या जीवनाचे गाणे हे प्रेमाच्या उत्कटतेतूनच फूलले आहे. अशी कवीची धारणा आहे.

स्त्रीचे भावविश्व व्यापणाऱ्या अनुभवांमध्ये प्रेमानुभावाला महत्वाचे स्थान राहिले आहे. तारूण्यसुलभ हळव्या प्रणयगीतांपासून प्रगल्भ प्रेमभावनेपर्यंतचे विविध रंग कवयत्रींनी टिपले आहेत. संजीवनी मराठी, पद्मा शांता शेळके यांनी प्रणयाच्या काही छटा व्यक्त करणारी गीते लिहीली, प्रेमातील उत्कटता, आतुरता, कातरता, दुःख असे भाव त्यांतून व्यक्त झाले. इंदिराबाईनी 'संरूगा', 'मारवा वाट बघते'. अशा कितीतरी कवितांमधून प्रेमानुभवातील गोडवा आणि विरहातील धग यांची पारदर्शकरीतीने अभिव्यक्ती केली. अलीकडील हेमा लेले यांचा प्रिय (१९९१) हा संग्रहही प्रेमानुभावातील विविध पदर उलगडण्याचा प्रयत्न करताना दिसतो. आजही कवयत्रींच्या प्रेमपर कवितांची संस्था इतर अनुभवविषयांवरील कवितांच्या तुलनेने जास्त आहे.

प्रेम भावनेमध्ये सहज समर्पणापासून ते शोषणापर्यंतचे वेगवेगळे कंगोरे दडलेले असतात. याची जाणीव एकिकडे होत असल्यामुळे साधारणतः १९७५ नंतर प्रेमकवितांमध्ये काही वेगळ्या जाणिवाही आढळतात. किंबहुना प्रेमभावनेशी निगडीत स्वार्थ, व्देश, वर्चस्व भाव अशा कंगोऱ्यांचे भान तिच्या कवितांतून व्यक्त होऊ लागले, प्रेमाच्या आवेगतृष्णेपोटी परस्परांच्या व्यक्तिमत्वांचा केला जाणारा उपहास सुचवणाऱ्या या ओळी पहा.

'' जीवघेण्या तहानेने आपण ठिपक्याएवढे लहान झालोय
एकमेकांना सावकाश शोषत, संपवत गेलोय''

त्याचवेळी जगण्याला अर्थपूर्णता आणणाऱ्या निर्मळ प्रेमभावनेचा शोध आणि शोषही या कवितेत दिसतोच ! अनुराधा पाटील यांनी किती सहजपणे हा भाव व्यक्त केला आहे. ''ही माझ्यात पसरलेली , तुझ्याबद्दलची गवतावरच्या फुलांसारखी, साधी निर्मळ आसक्ती '' २

सुरुवातीला केवळ प्रेमभावनेविषयीच बोलणारी कविता त्या अनुभवावर कशी पकड मिळवू लागली आहे. हे यातून लक्षात येते.

स्त्री ही मुलतःच संवेदनशील आहे. प्रेम हा तिचा स्थायीभाव आहे. ज्याच्यावर ती प्रेम करते तेथे ती हातचे राखून ठेवण्याचा प्रयत्न करत नाही साठोत्तरी कालखंडात कवयित्रीनी प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या विपूल कविता लिहिल्या त्यामधून त्यांनी प्रेमभावनेच्या विविध छटांचे चित्रण अतिशय उत्कटपणे केले प्रीती हा कवयित्रीच्या कवितेचा गाभा आहे. असे म्हटल्यास वावगे ठरू नये. जीवनविषयक विचार प्रकट करताना प्रीती त्यांच्या जीवनाच्या मुळाशी आहे. ही प्रीती बंडखोर प्रवृत्तीची मात्र नाही. कवयित्रींनी आपल्या काव्यात पुरूषांची निर्भत्सना केली नसून पुजाच बांधली आहे. स्त्रीचे अंतकरण अत्यंत कोमल व संवेदनशील आहे ह्याचा प्रत्यय प्रेमानुभव चित्रित करणाऱ्या कवितामधून येतो.

भावोत्कट व दर्जेदार कविता लिहिणाऱ्या तसेच संतकवयित्रींच्या अभ्यासक असलेल्या सुहासीनी इर्लेकरांच्या तृप्ती (१९६१), 'अक्षर' (१९८४) ह्या काव्यसंग्रहामधून त्यांची हळुवारपणे प्रेमानुभव सांगण्याची पद्धत लक्षात येते. इंदिरा संतांच्या कवितेतील प्रेमानुभवाप्रमाणे सुवासिनीबाईंच्या कवितेतील प्रेमानुभव निसर्गाच्या पार्श्वभुमीतून व्यक्त झाला आहे. प्रेमाच्या सफल व विफल भावना तीव्र शोक व्यक्त करत नाही किंवा उग्र रूपातही व्यक्त होत नाही. अस दिसते घोटाळत राहते. सुहासिनी बाईच्या काव्यसंग्रहातून सफल प्रेमापेक्षा विफल प्रेमभावना अधिक व्यक्त झाली आहे, रागाने प्रेम दुरावते असे म्हटले जाते. ह्याच संदर्भातील प्रेमभावना 'तुझ्या माझ्या अबोल्यात' ह्या कवितेतून पूढीलप्रमाणे व्यक्त होते,

'' तुझ्या माझ्या अबोल्यात
ओढ हवी मीलनाची
परी गडे मीलनांत
हौस हवी कलहाची '' ( सुहासिनी इर्लेकर, तृप्ती, पृ. क्र. ७७ )

प्रेमाचे एक आदर्श जग निर्माण करण्यात त्यांची कविता रंगते त्यांच्या कवितेतील प्रियकर धूसर आकाशासारखा जाणवतो.

हिरा बनसोडे त्यांनी पौर्णिमा १९७० व फिर्याद १९८४ ह्या आपल्या दोनही काव्यसंग्रहामधून स्त्रीचे जीवनानुभव समर्थपणे मांडले आहेत. त्यांच्या कवितां मधून येणाऱ्या अनुभवांना एक स्त्री म्हणून व दुसरी दलित स्त्री म्हणून अशी दुहेरी धार आहे. स्त्रीत्वाचे सनातन दुःख त्यांच्या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त झाले आहे. स्त्री जीवनाचे अनेकांनी चित्रण त्यांनी केले ओ हिरा बनसोडे ह्यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या प्रेमानुभव पूढील प्रकारचा आहे.

'' प्यासी अधीर रात्र
कमलकळीतला सुगंधी पृणय
तृप्त अतृप्त बावऱ्या क्षणांनी
हरवलेले विश्व समर्पित तू-मी '' (हरा बनसोडे, फिर्याद, पृ. क्र. १७ )

हिरा बनसोडे ह्यांची कविता खरेतर सामाजिक अधिक आहे. परंतु प्रेमानुभव ही तितक्याच उत्कटपणे त्यामधून व्यक्त झाला आहे.

प्रभा गणोरकर ह्यांच्या व्यतीत (१९७४) विवर्त (१९८५) ह्या काव्यसंग्रहामधून प्रेमानुभवाच्या विविध छटा व्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या कवितेतील दुःख अंतर्मुख आहे. प्रितीच्या निराशेतून, दुरतेतून ते जन्मलेले आहे, गणोरकरांचे अनुभव विश्व समृद्ध आहे. स्त्रीच्या खास अनुभवांना व्यक्त करता-करताच त्या लिंगनिरपेक्ष अनुभवही व्यक्त करतात स्त्रीधर्माच्या आदिम मुल्यांचा ध्यास त्यांच्या कवितेतून दिसतो . त्यांच्या कवितेतील दुःख प्रीतीच्या निराशेतून, दूरतेतून निर्माण झाले आहे. त्यांच्या कवितेतून सफल प्रमानुभवापेक्षा विफल प्रेमानुभव प्रामुख्याने व्यक्त झाला आहे. प्रेमजीवनात एकाएकी कटूता कोढून आली ह्याचा त्यांच्या कवितेतील स्त्रीला शोध लागत नाही. पण तिचे मन उदास होते. कधी कधी हा उदासपणातून कडाक्याचे भांडण होते आणि नाही. पुरूषसत्ताक समाजीवनात स्त्रीला अनेक प्रकारे हार खावी लागते. ह्याचे प्रत्यंतर येथे व्यक्त होते. मनातील हा राग इतरांवर काढला म्हणूनही ती दुःखी होते प्रभा गणोरकरांच्या कवितेतील स्त्री ह्यातून मार्ग काढते. ह्या जीवनाची सवय करून घेते.

गणोरकरांच्या कवितेत प्रेमातील सुरुवातीचा आवेग त्यानंतर अटळ पराभव आणि त्यावर मात करण्यासाठी केलेले प्रयत्न असे तीन टप्पे दिसतात.

स्त्रीवादी कवयित्री म्हणून साठोत्तरी कवितेत ज्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. अशा अश्विनी धोंगडे यांनी 'स्त्रीमुक्त' (१९८८) व 'अन्वय' (१९९२) या आपल्या दोन काव्यसंग्रहामधून प्रेमानुभवापेक्षा स्त्रीवाद, स्त्रीत्वाचा विचार प्रामुख्याने मांडला आहे. स्त्रीजीवनाची घुसमट हेच स्त्रीमुक्तचे प्रमुख आशयसूत्र आहे. त्याच्या प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कवितेतून सफल विफल प्रेमानुभव व्यक्त झाला आहे. त्यामधून प्रेमाचा खेळ, नात्यातील गुंता, प्रेमातील आभास, तुटलेपणाची जाणीव असं काही मोजके भाव दिसतात. प्रेमात हारजीत नसते असे म्हणत असतानाच मूळ चेहरे ओळखू नयेत इतका या नात्यातील गुंता वाढत जातो. दोघे एकाच घरात राहतात पण मनाने एकमेकांपासून खूप दूर असतात, एकमेकांना समजून घेण्याची त्यांची कुवत संपते तेव्हा अश्विनीबाईच्या कवितेतील प्रेयसी म्हणते.

''माझ्या घराचे प्रवेशद्वार
उंच तुझ्या व्यक्तित्वाइतके
पण दाराशी येताच
तुझी उंची दरक्षणी
दारापेक्षा वाढणारी'' (अश्विनी धोंगडे, अन्वय, पृ.क्र. ३०)

## काव्यातून प्रकट होणारे सौंदर्यवादी मन

आसावरी काकडे यांचे आरसा : १९९० आकाश : १९९१, लोह : १९९५ असे कवितासंग्रह आहेत. त्यांच्या आरसा : १९९० या पहिल्या काव्यसंग्रहाला ह.स. गोखले पुरस्कार, विशाखा पुरस्कार तसेच राज्य पुरस्कारही मिळाला आहे. त्यांच्या काव्यसंग्रहातून चिंतनशील जाणवते. त्यांच्या कवितांमधून समंजस प्रियकराची इच्छा करणारी प्रेयसी दिसते. प्रियकराचे प्रेम आपल्याला पेलवेल का ह्या विचाराने धास्तावलेली स्त्री दिसते. आसावरीबाईच्या कवितेतील स्त्री समजुतीने व तडजोडीने वागू पाहणारी आहे. त्यांच्या आरसा : १९९० ह्या काव्यसंग्रहातील प्रेम तेव्हाही ह्या कवितांमधून प्रामुख्याने प्रेमानुभव व्यक्त झाला आहे. प्रेमाची व्याख्या, प्रेमाचे स्वरुप सांगून समंजस प्रियकराची इच्छा व्यक्त होताना दिसते. प्रेम म्हणजे काय याविषयी त्या म्हणतात,

कवितांमधून प्रामुख्याने प्रेमानुभव व्यक्त झाला आहे. प्रेमाची व्याख्या, प्रेमाचे स्वरुप सांगून समंजस प्रियकराची इच्छा व्यक्त होताना दिसते. प्रेम म्हणजे काय याविषयी त्या म्हणतात,

'दु:ख देतं, ते प्रेम नव्हे
हक्क सांगतं, ते प्रेम नव्हे
प्रेम म्हणजे समजून घेणे
न सांगता !
प्रेम म्हणजे ममत्व सोडणं
न सांगता' (आसावरी काकडे, आरसा, पृ.क्र. २४)

प्रेमाविषयी त्यांची भूमिका उल्लेखनीय आहे. प्रेम म्हटले की वचन, आणाभाका येतात, प्रेमात दिलेली वचने पूर्ण करता येतातच असे नाही.

अनुराधा पाटील यांच्या कवितेतून सफल व विफल प्रेमाचे भावविश्व व्यक्त झाले आहे. प्रेम वैफल्यातून येणारे एकाकीपणाचे दु:ख, त्यामुळे जाणवणारी उदासीनता इत्यादी भाव व्यक्त होतात. विफल प्रेमाचे जीवघेणे दु:ख त्यांच्या कवितेतून दिसते. प्रियकराची आतुरतेने वाट पाहणारी प्रेयसी सातत्याने व्यक्त होते. प्रियकराच्या शब्दावर विश्वास ठेवून जगणारी, त्याची अंत:करणपूर्वक वाट पाहणारी स्त्री या कवितांमधून दिसते. सातत्याने होणाऱ्या निराशेने ती आपल्या मनाला समजावते.

'कधी तरी केव्हा तरी मा. यातली मी
सांगते मला नको ठोठावूस ती
न उघडणारी बंद दारे' (अनुराधा पाटील, दिगंत, पृ.क्र. ५०)

समजूतदारपणे आपले प्रेम विसरणारी स्त्री येथे दिसते. तू नसतानाही ह्या कवितेतील प्रेयसी आपल्या मनाला समजावते.

त्यांच्या 'दिगंत' १९८१ ह्या संग्रहामध्ये जेवढ्या प्रकर्षाने प्रेमानुभव व्यक्त झाला आहे तेवढ्या प्रकर्षाने दिवसेंदिवस : १९९२ या संग्रहामध्ये मात्र दिसत नाही.

प्रखर जीवनविचारातून मलिका अमर शेख यांची कविता वाचकांसमोर येते. 'वाळूचा प्रियकर' १९७९ ह्या संग्रहामधून स्त्रीत्वाचे नवे भान धीटपणे व्यक्त झाल्याचे दिसते. सुशीला पगारिया, रजनी परुळेकर ह्यांच्या कविताप्रमाणेच मलिकांच्या काव्यात स्त्रीला पुरुष हा अधिक दु:ख देताना दिसतो. तिने अशा परिस्थितीतही त्याला क्षमा केल्याचे दिसते. विफल प्रेमानुभव त्यांच्या कवितेतून अधिक स्पष्टपणे व्यक्त झाला आहे. प्रियकराच्या प्रतिक्षेत सतत राहणे तिला नको वाटते. त्याच्या आठवणीमुळे अंत:करणाचा भडका उडालेली स्त्री त्यांच्या कवितेमधून दिसते. फुलांच्या बागेची अपेक्षा करणाऱ्या विरहिणीच्या वाट्याला निवडुंगाचा ताटवा यावा अशी तिची निराशा होते. मलिकांच्या कवितेत तडजोड करणारी व सततच्या तडजोडीने दु:खी झालेली स्त्री दिसते. मागचे प्रेम विसरणेही तिला शक्य नाही. त्यामुळे तिच्या मनाची अवस्था पुढीलप्रमाणे होते.

''हातात सुईदोरा आहे म्हणून
सगळं कायमचं शिवून टाकता येतं थोडंच
मी स्वत:ला उसवू लागले
तर तेही जमेना'' (मलिका अमर शेख, वाळूचा प्रियकर, पृ.क्र. ६९)

मलिकांच्या कवितेतील स्त्री विद्रोही आहे. अन्यायामुळे ती पेटून उठते. स्वत:बरोबरच इतरांवरही ती सूड उगवू पाहते. स्वत:च्या तारुण्याचे रेशमी वस्त्र चोचीत घेऊन गेलेल्या प्रियकरासाठी ती झुरते. नैराश्य हा तिला पहिला मृत्यु वाटतो. म्हणून आयुष्याला टाके घालणाऱ्या या स्त्रीला गोव्यातील समुद्रकिनाऱ्यावर गेल्यावर आटीच्या एकुलत्या मुलाच्या मृत्युच्या दु:खामुळे आपले दु:ख काहीच नाही असे वाटते. या अनुभवांमुळे तिच्या अंत:करणातील वाळूचा प्रियकर घरंगळत नाहीसा होतो.

साठोत्तरी काळात मोठ्या ताकदीने काव्यलेखन करणारी कवयित्री म्हणून नीरजांचे नाव घेतले जाते. 'निरन्वय' १९८७, वेणा : १९९४ हे त्यांचे काव्यसंग्रह त्याच्या निरन्वय काव्यसंग्रहावर इंग्रजी वाडमयाचा प्रभाव दिसतो. निरजा यांच्या या काव्यसंग्रहात 'प्रतिक्षा'सारखी एखादी कविता सोडली तर हळवे होण्यास नकार देणारी ही कवयित्री आहे. काव्यासंबंधीच्या मराठी कवयित्रीनी जपलेल्या कल्पना नीरजा ह्यांनी बाजूला ठेवल्या आहेत. हळूवार किंवा सुंदर असणारी भावनानुभूतीही त्यांनी बाजूला ठेवली आहे. स्त्रीची पारंपारिक भूमिका नाकारणाऱ्या नीरजा यांनी प्रेमाची विविध रुपे कवितेतून व्यक्त केली आहेत. 'वेणा' ह्या संग्रहात मात्र त्यांच्या कवितेतील प्रेमानुभव अशा प्रकारे व्यक्त झाला आहे.

''तुझ्या ओठांच्या पाकळ्या
जेव्हा दरवळल्या
माझ्या अंगाअंगातून
तेव्हा माझ्या प्रत्येक श्वासाने
गायली अगणित गाणी
तुझ्या नावाची.'' (नीरजा, वेणा, पृ.क्र. ७०)

प्रियकराने आत्यंतिक ओढीने घातलेली साद यासारख्या कवितांमधून व्यक्त झाली आहे. प्रेमसुखात नांदणारे त्यांचे मन ह्यातून व्यक्त झाले आहे. लेखन, वाचन, संशोधन यांचा समृध्द वारसा मिळालेल्या अरुणा ढेरे यांचे 'प्रारंभ' (१९८७), यक्षरात्र (१९८७), मंत्राक्षर (१९९०), निरंजन (१९९४) व पानावरचे थेंब (१९९५) हे कवितासंग्रह होत. त्यांच्या कवितांवर लोकसाहित्याचा मोठा प्रभाव जाणवतो. स्त्री व तिचे भावजीवन अरुणा ढेरे ह्यांच्या कवितांचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच स्त्रीच्या जीवनातील विविध अवस्था, तिची मानसिक आंदोलने या सर्व गोष्टी त्यांच्या कवितांमधून आढळतात. लहान मुलीपासून ते नवचर प्रेमात न्हाऊन निघणाऱ्या प्रेमिकेपर्यंतच्या अनेक स्त्रिया त्यांच्या कवितांमधून भेटतात. प्रेमाचा आविष्कार करणारी संयत, समंजस प्रेमिकाही त्यांच्या कवितेत भेटते. अरुणा ढेरे यांनी 'तो' आणि 'ती' यांचे प्रेमानुभव यातील नाजूक बंध उत्कटपणे उलगडले आहेत. एकमेकांमध्ये गुरफटणे, अवेळी भेटू नको असे सांगणे, छोट्या छोट्या

कारणांवरुन रुसणे, फुगणे, त्यामुळे निर्माण झालेले तणाव आणि तरीही एकमेकांच्या भेटीसाठी व्याकुळ झालेले मन त्यांच्या कवितेतून चित्रित झाले आहे. सजणाची उत्कटपणे वाट पाहणारी, त्याचा रोखठोक स्वभाव माहीत असूनही त्याच्या थोड्याशा कटू बोलण्यामुळे दु:खी झालेली स्त्री म्हणजे

''सारे जरी कळते रे सहज मला कळते
तरीही तुझ्या एखाद्या शब्दाने, स्पर्शाने
एखाद्या करण्याने
जिवापास दुखते रे फार फार दुखते'' (अरुणा ढेरे, मंत्राक्षर, पृ.क्र. १५)

स्त्रीचे संवेदनशील मन या ओळीमधून उत्कटपणे व्यक्त झालेले दिसते. आपल्या सजणाने कितीही रागावले, टोचले तरी त्याच्यावरील प्रेम कमी होत नाही. पती हा तिच्या जीवनाचा अविभाज्य घटक असतो.

अरुणा ढेऱ्यांच्या कवितेतील स्त्री अनुभवाने समजूतदार झाली आहे. प्रियकर जवळ नसल्यामुळे होणारी तडफड, बेचैनी शांत झाली आहे. ती अनुभवाच्या अनेक धक्क्यांनी सावरते, समजंस व शांत होते.

अरुणा ढेरे ह्यांच्या कवितेत प्रेमिका, वंचिता अशी स्त्रीरुपे व्यक्त झाली आहेत. त्यांच्या कवितेतील स्त्रीमनाच्या विकासाची दिशा अगदी स्पष्टपणे दिसते. सुरुवातीची भावव्याकुळता, उत्कटता, बावरलेपणा नंतरच्या कवितेतून संथ, शांत, समजूतदार होत जातो. अरुणा ढेरे ह्यांच्या कवितांविषयी मीना वैशंपायन म्हणतात, ''अरुणा ढेऱ्यांच्या कवितांचा कालानुक्रमे विचार केला तर असे दिसते की, त्यांच्या प्रारंभीच्या कविता स्वत:च्या किंवा इतरांच्या वैयक्तिक सुखदु:खाशी निगडीत आहेत. परंतु नंतर मात्र त्या वैयक्तिकाकडून समाजाकडे वळल्या आहेत.''

प्रज्ञा लोखंडे यांना लेखनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून दया पवारांकडून मिळाला. आत्यंतिक हळवेपणा व तीव्र संवेदना हे गुण त्यांच्या प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या कवितेतून दिसतो. 'त्यांच्या कवितेतील प्रेयसी प्रियकराच्या मिटून जाऊ पाहणारी आहे. वैफल्याचे दु:ख तिला पचवावे लागत आहे. हे दु:ख पचविणे किती कठीण आहे हे अर्थ ह्या कवितेतून व्यक्त झाले आहे.' प्रियकराच्या नसण्यामुळे प्रेयसीचे मन दु:खी होते. आपल्या अंतकरणाला वणवा लागला आहे असे तिला वाटते. प्रत्येक संध्याकाळी ती त्याची वाट पाहते व त्याच्या न येण्यामुळे ती संध्याकाळ तिला कोरडी, रखरखीत व आर्त वाटू लागते. काही वेळा त्यांच्या व तिच्या नात्यामध्ये साचलेली धूळ हलक्या हातांनी पुसून काढण्याचा व नव्याने रूजवण्याचाही ती विचार करते पहा.

''तिच्या माझ्या नात्यावर
साचलेली धूळ
मी हालकेच पुसते
आभाळावर दाटून आलेल्या
काळसर उदास तवंगात
मी नव्याने रूजते.'' लोखंडे, अंत:स्थ, पृ.क्र. ३६)

प्रज्ञा लोखंडे ह्यांच्या कवितेतील प्रेयसी समंजस आहे, प्रेम वैफल्याचे दु:ख सहन करण्याचा प्रयत्न करते. ती धीट व धाडसी आहे.

## समारोप :-

अशा प्रकारे साठोत्तरी कवयित्रीच्या काव्यामध्ये प्रेमानुभव विविध अंगानी व्यक्त झाला आहे. या कविता तर भावनानुभवाच्या दृष्टीनेही प्रभावशाली आहेत. ह्या कवितेतून प्रामाणिकपणा हा गुण दिसतो. हा प्रेमानुभव निर्भयपणे व्यक्त झाला आहे. सफल व विफल प्रेमाच्या अनेक छटा त्यातून दिसतात. त्या कवितांमधून प्रेमाला शरण गेलेली प्रेमिका दिसते.

प्रियकराचे सुख व दु:ख ह्या दोहोचाही स्वीकार करणारी सोशिक, समंजस स्त्री दिसते. स्त्रीच्या जीवनात प्रेमाला तसेच तिच्या प्रियकराला अनन्यसाधारण स्थान असल्याचे दिसते. प्रेमाची विविध रूपे मांडणाऱ्या ह्या कवितेतून स्त्रीचे अतिसंवेदनशील मन व्यक्त झाले आहे. प्रेम हा स्त्रीच्या जीवनाचा कणा आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. ह्या कवितांमधून प्रेमातील उत्कट क्षणाबरोबरच विरहाचे, वैफल्याचे दु:खही प्रकर्षाने व्यक्त झालेले आहे.

प्रस्तुत प्रकरणातून स्त्रीवादी जाणिवांचे स्वरूप विशेष चितारण्याचा प्रयत्न केला आहे. १९८० नंतरच्या स्त्रीवादी काव्यातून कवयित्रीने नवे भान, नवे प्रश्न, नव्या जाणिवा अभिव्यक्त केल्या असून त्याचा परामर्श घेत स्त्रीवादी जाणिवांच्या आशयाचा जो विस्तृत पट आहे तो उकलून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. आजचे बदलते समाजजीवन व त्या समाजातील स्त्रीजीवन चितारीत असताना आजची स्त्रीवादी स्त्री समाजपरिवर्तनामुळे पारंपारिक स्त्रीकोषातून बाहेर पडून मुक्त जीवनाचा श्वास घेण्याचा प्रयत्न करीत असताना स्त्रियांचा होणारा प्रवास स्त्रीवादी कवयित्रीनी कशा प्रकारे अभिव्यक्त केला आहे याचे दर्शन घडविले आहे.

समाज जीवनात श्रध्दा आणि अंधश्रध्दा यांचा पगडा सामान्य लोकांवर मोठ्या प्रमाणावर होता त्यातूनच देवदासी प्रथा पुढे आली व त्याचे भोग माहक असल्याचे दिसते.

स्त्रीवादी चळवळ स्त्रीमुक्ती या चळवळी आज उभ्या राहत आहेत. त्यातून स्त्रीच्या जीवनात नवा आशावाद अंकुरीत आहे. स्त्रीला तिच्या हक्काची जाणीव होत आहे.

## संदर्भ ग्रंथ–

१) करोगल सुषमा– स्वातंत्र्योत्तर मराठी कविता– सुगावा– मासिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रेरणा विशेषांक १९९२ पृष्ठ क्र. ९०

२) वैशंपायन मीना– ललित मुंबई– जुलै १९९९ पृष्ठ क्र.– १४७–१४८

३) लोखंडे प्रज्ञा– अंत:स्थ– मानसन्मान प्रकाशन पुणे– १९९३ पृष्ठ क्र. ३६

४) वाकोडे मधुकर– काया मातीत मातीत, प्रस्तावना–देशमुख आणि कंपनी, पुणे दुसरी आवृत्ती १९९४, पृष्ठ क्र. ७